## प्रकरण ५ वे

(१) प्रास्ताविक

(२) माहितीचे निष्कर्ष व शिफारशी

(३) पुढील संशोधनासाठी विषय.

## प्रकरण ५ वे.

### निष्कर्ष शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय.

५.१ प्रास्ताविक :-

संशोधकाने उपयोगात आणलेल्या साधनाच्या साहयाने प्रस्तुत संशोधनासाठी जी माहिती गोळा केली त्या माहितीचे विश्लेषण यापूर्वीच्या प्रकरणात केले आहे. सदर विश्लेषण मिळालेल्या माहितीचे प्रतिनिधीत्व करणारे आहे.

५.२ माहितीचे निष्कर्ष व शिफारशी -

प्रश्नावली, मुलाखती व निरिक्षण या साधनाद्वारे मिळालेल्या माहितीचे निष्कर्ष व शिफारशी खालील प्रमाणे होत. संशोधनाचे क्षेत्र मर्यादित असल्याने प्रत्येक निष्कर्षाच्या खाली शिफारस देण्याची योजना केली आहे.

(१) हिंदी अध्यापनाची सुरवात जरी इयत्ता ५ वी पासून होत असली, तरी इयत्ता ८ वी मधील विद्यार्थी भाषिक कौशल्य आत्मसात करण्याच्या बाबतीत इयत्ता ५ वीतच आहेत.

इयत्ता ५ वी पासूनच विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्याचा विकास करण्यासाठी शिक्षकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. त्याकरिता विद्यार्थ्यांकडून वर्गात लावण्याकरिता व्याकरणाचे तक्ते प्राण्यांची माहिती मुहावरे व कहावते यांचे अर्थ इत्यादी बाबीवर इयत्ता ५ वी पासूनच लक्ष देऊन हिंदी विषय घटवून घेणे आवश्यक आहे.

(२) हिंदी भाषा शिकविणाऱ्या शिक्षकांना, इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये हिंदी अध्ययनाची विद्यार्थ्यांना जडलेली सवय इयत्ता ८ वी मध्ये फारशी बदलता आली नाही.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

विद्यार्थ्यांच्या इयत्ता ७ वी पर्यन्त जडलेल्या विविध सवयी बदलण्याकरिता शिक्षकांनी विविध अध्यापन पध्दतींचा वापर करणे आवश्यक आहे. तसेच भाषिक स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांना हिंदी भाषेतून बोलण्याची सवय लावण्याचा प्रयत्न या वर्गाला शिकविणाऱ्या शिक्षकांनी करणे आवश्यक आहे.

(३) बहुतेक सर्व विद्यार्थी केवळ क्रमिक पुस्तक हेच भाषिक कौशल्य संपादन करण्याचे साधन समजतात.

अध्यापन करणाऱ्या शिक्षकांनी अध्यापनात विविधता आणून व विविध स्पर्धा, नियतकालिके, वार्तापत्र, नाटयीकरण इ.प्रकल्पाची योजना आखून अशा प्रकल्पात या विद्यार्थ्यांचा सहभाग साधून घ्यावा. त्यामुळे भाषिक कौशल्य प्राप्त करण्यास पाठय पुस्तक हेच एकमेव साधन राहणार नाही.

(४) कौशल्य संपादनाचा जो क्रम भाषातज्ञ सांगतात त्यानुसार श्रवण हे पहिले कौशल्य आहे. विद्यार्थ्यांना हिंदी भाषा श्रवण करण्याची संधी केवळ हिंदी तासिके पुरती मर्यादीत असते, त्यामुळे आठवडयातून केवळ ५ तासिका हिंदी भाषा श्रवण करण्याची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त झालेली असते. त्यातून हिंदी अध्यापन करणारे शिक्षक अध्यापनात वारंवार मातृभाषेचा वापर करतात. यांचा परिणाम असा होतो की विद्यार्थ्यांना मातृभाषेतून हिंदीचे अध्ययन करावे लागते. भाषा शास्त्रानुसार ही बाब अनैसर्गिक नव्हे तर अशास्त्रीय आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या श्रवण कौशल्य बाबीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

विद्यार्थ्यांच्या श्रवण कौशल्याचा विकास करण्याकरिता विषय शिक्षकांनी आपले अध्यापन सरळ हिंदी भाषेतून करणे आवश्यक आहे.

तसेच आकाशवाणी व दूरदर्शन वरून सादर होणारे विविध हिंदी शालेय कार्यक्रम विद्यार्थ्यांना ऐकण्याच्या सुविधा प्रत्येक शाळेने उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे काव्यस्पर्धा, भेंडयातून पाठांतर, निबंध स्पर्धा, हिंदी गीतमंच इ. उपक्रमाची योजना करून विद्यार्थ्यांना अधिकाधिक हिंदी भाषेचे श्रवण करण्याची संधी शिक्षकानी उपलब्ध करून द्याव्यात.

(५) श्रवणानंतर आत्मसात करावयाचे दुसरे भाषिक कौशल्य भाषण होय. इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांना हिंदीतून संभाषण करण्याच्या संधी फारच कमी निर्माण केल्या जातात. दररोजच्या तासीकामध्ये काही विद्यार्थी एखादे दुसरे वाक्य हिंदीतून बोलतात. हिंदी शब्दाचे उच्चार चुकीचे असतात. उदा. "विनती" शब्दाचा उच्चार "विनंती" असा, तर "ग्यान" शब्दाचा उच्चार "ज्ञान" असा करतात. हिंदी भाषेची बोलण्याची ढब विद्यार्थ्यांना आत्मसात झाली नाही. संभाषण हे सरावावर आधारलेले असते. तसा सराव मिळत नसल्याने भाषेचा प्रत्यक्ष वापर करणे विद्यार्थ्यांना जमत नाही.

विद्यार्थ्यांना योग्य पध्दतीने हिंदी बोलता येण्याकरिता त्यांना वर्ग अध्यापनात हिंदीचा सराव देणे महत्वाचे आहे. हिंदी अध्यापनात शिक्षकानी विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे विद्यार्थ्यांनी हिंदीतून दिली पाहिजेत. व या करिता शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सुलभ हिंदीतून योग्य उत्तरे देण्याचा सराव दिला पाहिजे. त्याचप्रमाणे शाळेत हिंदी वक्तृत्व स्पर्धा ठेवण्यात याव्यात. अशा स्पर्धांत भाग घेण्याकरिता विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे. याशिवाय पाठ्यपुस्तकातील नाट्यीकरणाला योग्य असलेल्या पाठाचे नाट्यीकरण सादर करावे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्यामध्ये हिंदी बोलण्याचा आत्मविश्वास निर्माण होईल.

(६) हिंदी विषय अध्यापन करणा-या शिक्षकांना आपल्या भाषेच्या अद्यावत ज्ञानाविषयी नेहमी जागरूक रहाणे आवश्यक आहे. परंतु यासंदर्भात शिक्षकांना फारसी आस्था असलेली दिसून आली नाही. प्रश्नावलीत शिक्षकांच्या छंदाविषयीची माहिती आजमावण्याचा प्रयत्न केला, परंतु लेखन व वाचन हे छंद फारच थोडया शिक्षकाचे अंगी आहेत.

हिंदी अध्यापन करणा-या शिक्षकांनी विद्यार्थ्यांकरिता असलेल्या बालकथांचा संग्रह करावा व अशा कथा विद्यार्थ्यांच्या भाषेत, त्यांच्याकडून सांगून घ्याव्यात. तसेच कथा कथनाचे कार्यक्रम नाटयीकरण काव्य गायन इ. उपक्रमाद्वारे शिक्षकांनी आपले व विद्यार्थ्यांचे छंद वाढवण्याचा प्रयत्न करावा. शाळा प्रमुखानीही शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या छंद जोपासण्याकडे लक्ष द्यावे.

(७) हिंदी विषयाची दैनिके, विविध नियतकालिके, वाचणा-या शिक्षकाचे प्रमाण फारच कमी आहे. "नया शिक्षक, शिक्षा, विकलांगोके लिए शिक्षा, केअर इ. शिक्षणाच्या व शिक्षकाच्या संदर्भातील हिंदी भाषेतून निघणारी नियतकालिके शिक्षक वाचत नाही. त्यामुळे शिक्षणातील नवीन विचार ह-या अर्थाने त्यांच्यापर्यन्त पोचू शकत नाहीत व पर्यायाने विद्यार्थी देखील अशा नवीन ज्ञानापासून वंचित राहतात.

शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांकरिता निघणारी नियत कालिके, मासिके, द्वयमासिके त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांकरिता बालजगत, बालकथा संग्रह बालकाव्य संग्रह प्रत्येक शाळाने आपल्या ग्रंथालयात घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे एखादे हिंदी दैनिक प्रत्येक शाळेने घेतल्यास त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होईल. त्यामुळे हिंदी दैनिक वाचण्यास प्रवृत्त होतील.

(८) बार्शी तालुक्यातील फक्त एकाच शिक्षकाने हिंदी भाषेतून इयत्ता ८ वी च्या वर्गाला उपयुक्त पडेल असे पुस्तक लिहले आहे. इतर शिक्षकात लेखनाविषयी अनास्था दिसून आली.

हिंदी शिक्षकांनी प्रादेशिक भाषेतील शब्दाचा वापर करून लोकजीवन परंपरा यांचा परिचय विद्यार्थ्यांना घडेल व त्यातून राष्ट्रीय एकात्मता वाढण्यास मदत होईल. या दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांकरिता लेखन करणे आवश्यक आहे. अशा लेखनात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक मंडळाने प्रसिध्दी देऊन ते साहित्य सर्व शाळेपर्यन्त पोहचवणे आवश्यक आहे. तसेच शिक्षकांच्याकडून लेख मागवून त्याना लेखनकार्याबद्दल मानधन दिल्यास शिक्षक लिहण्याचा प्रयत्न करतील.

(९) हिंदी भाषेचा प्रचार व प्रसार करण्याकरिता राष्ट्रभाषा प्रचार समित्या कार्य करीत आहेत. या समित्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना विविध परीक्षांना बसण्याची संधी उपलब्ध करून देतात. परंतु अशा समित्याचे वर्ग चालवणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण या तालुक्यात शे. १०% इतके आहे.

विविध वर्ग चालविणाऱ्या शिक्षकाना कांही आर्थिक लाभ होणे आवश्यक आहे. हिंदी प्रसाराचे कार्य करणाऱ्या शिक्षकाना शासनाने किमान दोन वेतन श्रेणी वाढीव द्याव्यात अथवा विशेष मानधन द्यावे. त्याचप्रमाणे अशा शिक्षकांच्या या कामाचा विचार त्यांच्या शालेय कार्यभारात करावा.

(१०) भाषेचे ज्ञान वाढते निरनिराळ्या अध्यापन पध्दतीचे स्वरूप समजावे. सद्य:स्थितीचे आकलन व्हावे म्हणून शिक्षकानी कृतीसत्रे घेतली जातात अशा कृतीसत्रात बार्शी तालुक्यातील ४ ते ५ हिन्दी विषय शिक्षक भाग घेतात. यावरून या शिक्षकांना आपले ज्ञान वाढविण्याची गरज भासत नाही असे दिसून आले.

शाळा प्रमुखानी आपल्या शाळेतील विषय शिक्षकाना विविध कृतीसत्राना हजर राहण्यात प्रोत्साहन द्यावे व त्याचप्रमाणे त्यांची त्या काळातील रजेची व प्रवास भत्याची सोय करावी. अशा कृतीसत्राचा अहवाल आपल्या शाळेतील शिक्षक प्रबोधनीत सादर केला जावा.

(११) शिक्षक आपल्या अध्यापनात मातृभाषेचा वापर करतात. मातृभाषेचा वापर न करता हिंदी अध्यापनात उपयुक्त असलेल्या विविध पध्दतींचा वापर केल्यास विद्यार्थ्यांना हिंदी भाषा बोलता येईल व शिक्षकांनाही मातृ भाषेचा वापर अध्यापनात करावा लागणार नाही.

(१२) ८ वी च्या विद्यार्थ्याचे हिंदी विषयक सामान्य ज्ञान, शब्दसंपत्ती अपुरी असल्याने शिक्षक अध्यापनात मातृभाषेचा वापर करतात. नवीन कल्पना संबोध हिंदी भाषेतून विद्यार्थ्यांना समजत नाहीत. मातृभाषेचा वापर न करता आपले अध्यापन करण्यात पुढील अडचणी येतात असे शिक्षकांनी सांगितले.

१) इयत्ता ८ वी च्या ९०% विद्यार्थ्यांना हिंदी विषय मातृभाषेच्या मदती शिवाय समजत नाही.
२) इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांची हिंदी भाषेची शब्दसंपत्त अतिशय मर्यादीत असल्याने योग्य अध्ययन अनुभव देता येत नाही.
३) इयत्ता ८ वी चे विद्यार्थी हिंदी भाषेतून बोलण्यात घाबरतात.

भाषा विषयाची पाठ्यपुस्तके तयार करताना भाषेच्या अंगाकडे अधिक लक्ष पुरविले जावे. त्यामध्ये अध्ययन, अध्यापन पध्दती, वर्गातील वातावरण निर्मिती याकडे विशेष लक्ष दिले जावे. त्याचप्रमाणे पाठ्यपुस्तकातील दुर्बोध भाषेचा अडसर दूर करता यावा. पाठ्यपुस्तक मंडळाने याबाबीकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे. शाळेत उपलब्ध असलेल्या दृक श्राव्य शैक्षणिक साधनाचा वापर शिक्षक क्वचितच करतात. दूरदर्शन संचाची सोय बार्शी शहरातील एका शाळेत आहे. दूरदर्शनवरचे शैक्षणिक कार्यक्रम विद्यार्थ्यांना दाखविल्यात विद्यार्थ्यांच्या प्रगतीत लक्षणीय सुधारणा होऊ शकेल. याकरिता दूरदर्शनवरचे शै.कार्यक्रम हे विद्यार्थ्यांच्या शालेय वेळाशी निगडीत प्रसारीत केले जावेत.

(१३) तालुक्यातील एकाही शाळेतील ग्रंथालयात हिंदी भाषेचा विभाग वेगळा नाही. त्याचप्रमाणे ९८% शाळाना ग्रंथपाल नाहीत. ग्रंथालयाचे कामकाज शाळेतील अध्यापकाना दिलेले आढळते. अशा शिक्षकाना आपले शैक्षणिक

कार्य करीत हे काम करावे लागते. या तालुक्यातील दोन शाळांतून हिंदी भाषेतील शंभरी ते पाचशे ग्रंथ आहेत. बालवर्गांना उपयुक्त असणारे बालकथा साहित्य या शाळांतून उपलब्ध नाही. त्यामुळे या सर्व शाळांतील विद्यार्थी हिंदी भाषेतील पुस्तकांची मागणी करीत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वाचन या अंगाचा फारसा विकास झालेला नाही. पाठ्य पुस्तक देखील विद्यार्थ्यांना वाचता येत नाही.

शासनाने प्रत्येक शाळेत स्वतंत्र ग्रंथपालाची नेमणूक करावी. त्याप्रमाणे ग्रंथालय हा आवश्यक घटक मानला जावा. या ग्रंथालयात शिक्षकांच्याकरिता संदर्भ ग्रंथ, विद्यार्थ्यांकरिता संदर्भ ग्रंथ, बालकथा, बालगीत, एकांकीका इ. साहित्य असणे आवश्यक मानले जावे. शिक्षण अधिका-यांनी शाळेच्या ग्रंथालयाकडे विशेष लक्ष द्यावे. प्रत्येक शाळेला सुसज्ज ग्रंथालय तयार ठेवण्यास भाग पाडावे.

(१४) ९०% शिक्षक आपल्या अध्यापनात पाठ्यपुस्तक पध्दतीचा वापर करतात. हिंदी अध्यापनाच्या विविध पध्दती अध्यापनात राबविल्या जात नाहीत.

पाठ्यपुस्तक पध्दती सर्वच घटकांना वापरण्याऐवजी नाट्यीकरण, चर्चा, स्वाध्याय अशा विविध पध्दतींचा वापर शिक्षकांनी करणे आवश्यक आहे. या पध्दतींचा वापर होण्याकरिता प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापकांनी व पर्यवेक्षकांनी शिक्षकांच्या पाठ टाचणाकडे लक्ष दिले पाहिजे. त्याप्रमाणे शिक्षण महाविद्यालयातील प्राध्यापकांनी या शिक्षकांना नवनवीन पध्दतीची माहिती करून दिली पाहिजे.

(१५) विद्यार्थ्यांमध्ये हिंदी विषयाची गोडी निर्माण व्हावी म्हणून कांही उपक्रम विद्यार्थ्यांकरिता माध्यमिक शाळेत राबविले जातात. बार्शी तालुक्यातील ग्रामीण भागातील शाळांमध्ये असे कोणतेच उपक्रम राबविले जात नाहीत. शहरी भागातील शाळा वर्षातून दोन/तीन उपक्रम राबवतात.

प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेत विद्यार्थ्यांच्याकरिता पूरक वाचन, पाठांतर स्पर्धा, (लेखी/तोंडी) परिसंवाद, व्याख्याने, भाषिक खेळ व विविध दिन इ. उपक्रम सक्तीने राबवावेत. अशा उपक्रमात इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग विशेष प्रमाणात ठेवण्यात यावा.

(१६) बार्शी तालुक्यातील एकाही माध्यमिक शाळेतून हिंदी भाषेतून स्वतंत्र हस्तलिखीत निघत नाही. त्यामुळे माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या लेखन कलेस विकासाची संधी मिळत नाही.

प्रत्येक शाळेतून विद्यार्थ्यांच्याकरिता हिंदी भाषेतील हस्तलिखित निघाले पाहिजे. हिंदी शिक्षकांनी आपल्या शाळेत हस्तलिखित मंडळ स्थापन करून विद्यार्थ्यांकडून लेखन करून घेतले पाहिजे. विद्यार्थ्यांना लेखन कलेस प्रवृत्त करण्याकरिता कांही प्रलोभनाचा वापर करावा. त्यामुळे विद्यार्थ्यांना लेखन करण्यास संधी उपलब्ध होतील.

(१७) शिक्षक अध्यापनात पाठ्यपुस्तक पध्दतीचा वापर करतात. पाठ्यपुस्तक पध्दतीनुसार प्रश्न विचारणे, कठीण संकल्पनाचा अर्थ स्पष्ट करणे, कठीण शब्दाचा वाक्यात उपयोग करून घेणे, विविध प्रेरकाचा वापर करणे इत्यादी अध्यापनातील कौशल्यांचा फारसा वापर करीत नाहीत. त्यामुळे लेखन वाचन व भाषण या प्रमुख अंगाचा अपेक्षेप्रमाणे विकास होत नाही.

अध्यापनात शिक्षकांनी विविध पध्दतीचा वापर करावा. विद्यार्थ्यांचा सहभाग हा महत्वाचा घटक मानला जावा. नवीन अभ्यासक्रमात प्रसंगानुरूप (इन्सीडेंटल) अध्यापनाला महत्व देण्यात आले आहे. म्हणून शिक्षकांनी काही शब्द, रचना त्याना प्रसंगानुरूप शिकवाव्यात. यांचा अंतर्भाव अभ्यासक्रमात असेलच असे नाही. त्याचप्रमाणे इतर अनेक सोप्या सोप्या रचना विद्यार्थ्यांना शिकवण्याचा प्रयत्न करावा. अभ्यासक्रम पूर्ण करणे एवढेच ध्येय शिक्षकांनी ठेऊ नये.

(१८) शिक्षक आपल्या अध्यापनाच्या एका पाठघटकासाठी फारशी तयारी करीत नाहीत. प्रश्न विचारण्याचा क्रम, काही अध्ययन अनुभव देणे, अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे या गोष्टीना ९०% शिक्षक फारसे महत्व देत नाहीत. ते बालकेंद्रीत शिक्षण पध्दती ऐवजी पुस्तक व परीक्षा केंद्रीत झालेले आहेत.

शिक्षकानी आपल्या अध्यापनाचा दर्जा वाढवावा, त्याकरिता शाळेत केवळ अध्यापनाची सोय करून भागणार नाही. तर अध्यापनाची उत्तम व्यवस्था करणेही महत्वाचे आहे. याकरिता प्रत्येक शाळेनी शिक्षकाना अध्यापनात योग्य वातावरण निर्माण करून दिले पाहिजे. याशिवाय अन्य भाषांचे विशेष अध्ययन करण्यासाठी अखिल भारतीय स्थरावर जी ६ भाषाकेंद्रे, भाषा अध्यापनात विविधता आणण्याचे कार्य करीत आहेत व शिक्षकांना प्रशिक्षण देत आहेत. अशा प्रशिक्षणात जाण्यासाठी शिक्षकांना प्रोत्साहन देण्याचे काम शाळाचे मुख्याध्यापक व जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यानी करावे. त्यामुळे शिक्षकाना सेवांतर्गत प्रशिक्षण मिळेल. शिक्षकानी आपले अध्यापन प्रभावी व्हावे म्हणून पाठाचे टाचण तयार करावे. मुख्याध्यापक व पर्यवेक्षकानी शाळेतील शिक्षकाचे वर्षांतून कमीत कमी ५ पाठ पहावेत व योग्य त्या सुधारणा घडवून आणाव्यात. बालकेंद्रीत शिक्षण पध्दतीत वार्षिक परीक्षेलाच महत्व देण्यात येऊ नये. तर विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व क्षमतेचा विकास, आपल्या बोलण्याने इतरावर छाप पाडण्याची पात्रता, अभिनय, नकला, नेतृत्व गुणांचा विकास इत्यादी बाबीवर शिक्षकांनी योग्य प्रमाणात लक्ष द्यावे.

(१९) शिक्षकांना सेवांतर्गत संधी मिळत नाहीत. अध्यापन कार्यात विशेष मार्गदर्शन लाभत नाही. पाठ्यपुस्तक संपवणे एवढेच कार्य शिक्षक करतात. त्यामुळे अध्यापनाचा दर्जा सुधारण्याचे प्रयत्न केले जात नाहीत.

भाषा शिक्षकांनी साहित्यांतर्गत विचार प्रवाहाचा व कलामूल्यांचा

परिचय करून घेतला पाहिजे. नव्याने निर्माण होणाऱ्या साहित्याचे वाचन केले पाहिजे. देशात होणाऱ्या हिंदी साहित्य संमेलनाला हजर राहिले पाहिजे. शासनाने शिक्षकाना अशा संमेलनाचा लाभ घेण्याची व सेवांतर्गत सुविधा पुरविण्याची व्यवस्था केली पाहिजे. शिक्षण महाविद्यालयानी काही शाळा दत्तक घेऊन अशा शाळांचा गुणात्मक विकास केला पाहिजे.

(२०) या तालुक्यातील हिंदी शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये गुणात्मक बदल घडवून आणण्यासाठी विद्यार्थी व पालक यांची मदत फारशी होत नाही. विद्यार्थी फक्त हिन्दी तासापुरते शिक्षकाच्या सानिध्यात येतात.

विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनाशक्तीचा विकास करावा, सुंदर लेखन करावे. अभिव्यक्तीची धडपड करावी. यासाठी आवश्यक ती संधी त्यांना शाळामध्ये मिळाली पाहिजे. यामुळे विद्यार्थी व शिक्षक यांची जवळीक निर्माण होईल. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सहली काढाव्यात. सहलीतून सहजीवन व नेतृत्वाचा विकास करता येईल. प्रत्येक शाळेनी किमान वर्षातून दोन वेळा पालक मेळावे भरवावे व त्यातून पालकांच्या समस्या शाळेकडून त्यांच्या अपेक्षा, शिक्षकांच्या पालकाकडून अपेक्षा इ. बाबीवर चर्चा घडवून आणावी. यामुळे पालकाचे सहकार्य मिळवणे शिक्षकांना शक्य होईल.

(२१) इयत्ता ८ वीच्या पाठ्यपुस्तकातील गद्य पाठात विविधता नाही तसेच पद्य पाठात गेयता नाही. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शब्द संपत्तीचा विचार केलेला दिसत नाही.

पाठ्यपुस्तक तयार करीत असताना, विद्यार्थ्याचे वय आकलन शक्ती, ग्रहण शक्ती लक्षात घेतली जावी. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या अभिरुचीचा विचार करण्यात यावा. प्रादेशिक शब्दांना पाठ्यपुस्तकात प्राधान्य देण्यात यावे. गद्य पाठात विविधता असावी. या पाठांची संख्या वाढवावी व पद्य पाठामध्ये गेयता असावी.

३. पुढील संशोधनासाठी विषय -

प्रास्ताविक -

प्रस्तुत विषयाची व्याप्ती विस्तृत असल्याने संशोधकाला आपल्या संशोधनाचे क्षेत्र मर्यादीत ठेवणे भाग पडले. हिंदी अध्ययन अध्यापनाचे विविध पैलू आहेत. त्यामुळे या विषयाचा अभ्यास विविध अंगानी व सखोल दृष्टया केला जाऊ शकतो. अध्यापनाचे काम करीत असताना संशोधकाला हिंदी अध्ययन अध्यापनाच्या संदर्भातील विविध समस्या दिसून आल्या. या समस्यांचा तपशीलवार अभ्यास होणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधन बार्शी तालुक्यातील माध्यमिक शाळांतील इयत्ता ८ वी च्या हिंदी विषय अध्यापनापुरते मर्यादीत असून एक सामान्य सर्वेक्षण आहे. सदर संशोधन हिंदी अध्ययन अध्यापनाच्या त्रुटी दूर करण्याकरिता उपयुक्त ठरेल अशी संशोधकाला आशा वाटते.

संशोधन करीत असताना पुढील संशोधनाकरिता सुचलेले काही विषय खाली दिले आहेत.

१) बार्शी तालुक्यातील माध्यमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते ७ वीच्या हिंदी अध्यापनाचा चिकित्सक अभ्यास.

२) सोलापूर जिल्ह्यातील इतर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील इयत्ता ८ वीच्या हिंदी अध्यापनाचा चिकित्सक अभ्यास.

३) बार्शी तालुक्यातील माध्यमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते ८ वी विद्यार्थ्यांच्या हिंदी शब्द संपत्तीचा अभ्यास.

४) सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांच्या हिंदी व्याकरणाच्या चुकांची कारणे शोधणे.

५) बार्शी तालुक्यातील इयत्ता ५ ते ८ वीच्या विद्यार्थ्यांच्या भाषा विषय अध्यापनाच्या सद्य:स्थितीचा अभ्यास.

६) माध्यमिक शाळेतील अभ्यासक्रमातील हिंदी विषय व इतर विषयाचा समवाय तपासून पहाणे.

७) इयत्ता ८ वी चे पाठ्यपुस्तक व पुरवणी पुस्तकाचे पुनर्मूल्यांकन करणे.

८) सोलापूर जिल्ह्यातील इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांच्या हिंदी लेखनातील चुका व त्या सुधारण्यासाठी करावयाचे प्रयत्नाबाबत चिकित्सक अभ्यास करणे.

९) सोलापूर जिल्ह्यातील इयत्ता ५ वी ते १० वी या वर्गाकरिता उपयोगात आणल्या जात असलेल्या अध्यापन पध्दतीचा व साधनांचा चिकित्सक अभ्यास.

१०) सोलापूर जिल्ह्यातील इयत्ता ८ वी ते १० या वर्गातील विद्यार्थ्यांच्या निबंध लेखनाच्या संदर्भात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास.

परिशिष्ट क्र. १

श्री.प्रकाश मनोहर क्षीरसागर
शिक्षण महाविद्यालय, बार्शी
जि. सोलापूर.
२६-१-१९८८

स.न.वि.वि.

मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. परीक्षेसाठी प्रबंध लेखन करीत आहे. माझ्या संशोधनाचा विषय -

"बार्शी तालुक्यातील माध्यमिक शाळांतील इयत्ता ८ वी च्या हिन्दी विषय अध्यापनाचा चिकित्सक अभ्यास करणे."

शिक्षण महाविद्यालय, बार्शी येथील प्राचार्य डॉ.सी.बी.शितोळे संशोधनास मार्गदर्शन करीत आहेत.

कृपया आपण सोबतच्या "प्रश्नावलीतील" माहिती भरून सहकार्य करावे. सदर माहितीचा उपयोग संशोधनासाठीच केला जाईल. माहिती गुप्त ठेवली जाईल. संशोधनाचे निष्कर्ष आपणांस कळवू.

आपला,

श्री. प्र. म. क्षीरसागर
एम्.फिल्.(शिक्षणशास्त्र)
शिक्षण महाविद्यालय, बार्शी.

## संशोधनाची उद्दिष्टये

१) माध्यमिक शाळेत उपलब्ध असलेल्या हिंदी अध्यापनाच्या शैक्षणिक सुविधांचा अभ्यास करणे.
२) हिंदी शिक्षकांच्या व्यावसायिक तयारीचा अभ्यास करणे.
३) हिंदी अध्यापनासाठी वापरात येणारे अध्यापन तंत्र आणि पध्दती यांचा अभ्यास करणे.
४) हिंदी अध्यापनात सुधारणा होण्यासाठी उपाय सुचविणे.

हिंदी विषय - शिक्षकांसाठी प्रश्नावली.

विषय -

"बार्शी तालुक्यातील माध्यमिक शाळांतील इयत्ता ८ वी च्या हिंदी विषय अध्यापनाचा चिकित्सक अभ्यास करणे."

## प्रश्नावली भरण्यासंबंधीच्या सूचना.

१) काही प्रश्नासमोर प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. आपण सहमत असलेल्या प्रश्नापुढे बरोबर ( ✓ ) अशी खूण करा. आपणास हवे असलेले उत्तर तेथे न मिळाल्यास कृपया इतर/शिवाय या सदरापुढे आपले उत्तर लिहा.
२) काही प्रश्नांची उत्तरे "होय/नाही" स्वरुपाची आहेत. तेथे नको असलेला शब्द खोडावा.
३) ज्या प्रश्नांची कारणे विचारली आहेत. तेथे कारणे लिहावीत.
४) मोकळ्या सोडलेल्या जागी माहिती थोडक्यात द्यावी. तथापि जागा अपुरी वाटल्यास प्रश्नावलीच्या शेवटी जोडलेल्या को-या कागदावर प्रश्नक्रमांक व उपप्रश्न क्रमांक लिहून तेथे माहिती द्यावी.

## शिक्षकांची माहिती.

१) शिक्षकाचे संपूर्ण नांव -

२) शाळेचे नांव -

३) गावाचे नांव -

४) शिक्षकाची शैक्षणिक आर्हता -

५) शैक्षणिक अनुभव - वर्षे

६) आपल्या अध्यापनात उपयुक्त ठरेल असे कोणते साहित्य आपल्या विद्यालयात आहे ?

१) रेडिओ -

२) टेपरेकार्डर -

३) विविध नकाशे -

४) विविध तक्ते व चित्रे -

५) दूरदर्शन संच -

६) इतर -

७) हिंदी विषयाचे अध्यापन प्रभावी व्हावे म्हणून आपण कोणते साहित्य वापरता ?

१)

२)

३)

४)

५)

८) वरील शैक्षणिक साधने आपणांस सहजासहजी उपयुक्त होतात काय ?

(होय / नाही)

९) शैक्षणिक साधने उपलब्ध होण्यामध्ये कोणत्या अडचणी येतात ?

१०) आपल्या शाळेतील ग्रंथालयात हिंदी विभाग वेगळा आहे का ?
(होय/नाही)

११) असल्यास या विभागात किती पुस्तके आहेत ?

१२) हिंदी विभाग वेगळा असल्यास ग्रंथालयात एकूण हिंदीची पुस्तके किती आहेत ?

१३) ही पुस्तके विद्यार्थ्यांना वाचण्यास मिळतात काय ?

१४) हिंदी अध्यापनासाठी ग्रंथालयाचा आपणास उपयोग होतो काय ?
(होय/नाही)

१५) पदवी परीक्षेचे विषय - प्रमुख - दुय्यम

१६) प्रशिक्षणासाठी निवडलेल्या अध्यापन पध्दती.

१)

२)

१७) पदवीव्युत्तर परीक्षेचे विषय - प्रमुख - दुय्यम.

१८) आपण कोणते भाषाविषय शिकविता ?
मराठी - हिंदी - इंग्रजी - संस्कृत - इतर.

१९) कोणकोणत्या इयत्तांना हे विषय शिकविता.

२०) हिंदी विषय शिकविण्याचा अनुभव - वर्षे - महिने.

२१) आपणास खालील पैकी कोणते छंद आहेत.

१) लेखन -

२) वाचन -

३) अभिनय -

४) नाट्यीकरण -

५) छंद मंडळाचे संचलन.

६) खेळ -

७) इतर -

२२) आपले छंद विकसित होण्यासाठी आपण कोणते उपक्रम करता.

१) ग्रंथ संग्रह करतो.

२) वाचनालयात नित्य जातो.

३) वर्तमान पत्रे विकत घेतो.

४) स्वत: मासिक विकत घेतो.

५) ग्रंथालयाचा सभासद होतो.

६) चर्चा सत्रात भाग घेतो.

२३) आपण हिंदी विषयाची कोणती दैनिके वाचता -

१)

२)

३)

४)

५)

२४) आपण हिंदी विषयाची कोणती नियत कालिके वाचता -

२५) आपण नियतकालिकातून लेखन केले आहे का ? (होय/नाही)

२६) कोणत्या विषयाचे लेखन केले आहे ?

२७) आपली कांही पुस्तकें प्रसिध्द झाली आहेत का ? (होय/नाही)

२८) प्रसिध्द झाली असल्यास कोणत्या भाषेत ?

२९) आपल्या प्रसिध्द झालेल्या पुस्तकांची नावे लिहा.

३०) आपण राष्ट्रभाषा प्रचार कार्यासाठी वर्ग घेता काय ? (होय/नाही)

३१) घेत असल्यास वर्गात किती विद्यार्थी असतात ?

३२) आपण खालील पैकी कोणत्या संस्थेचे सभासद आहात काय ?

१) महाराष्ट्र राष्ट्रभाषा, पुणे

२) राष्ट्रभाषा सभा, वर्धा

३) अखिल भारतीय हिंदी परिषद, आग्रा.

४) दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, मद्रास.

५) हिंदी साहित्य मंडळ.

६) हिंदी विषय शिक्षक संघटना.

७) हिंदी जिल्हा शिक्षक संघटना.

८) इतर -

३३) हिंदी विषयासाठी आयोजित केलेल्या राज्य/जिल्हा/तालुका स्थरावरील कृतीसत्रात आपण भाग घेता का ? (होय/नाही.)

३४) घेत असल्यास गेल्या तीन वर्षांत आपण किती वेळा भाग घेतला ?

३५) अशा प्रकारच्या हिंदी विषय कृतीसत्राना आपण तज्ञ मार्गदर्शक म्हणून काम केले आहे का ? (होय/नाही)

३६) हिंदी विषयाच्या वक्तृत्व स्पर्धांसाठी आपण विद्यार्थ्यांची तयारी करून घेता का ? (होय/नाही)

३७) हिंदी अध्यापन करीत असताना आपणांस मातृभाषेचा वापर करणे आवश्यक वाटते का ? (होय/नाही)

३८) आपण मातृभाषेचा उपयोग न करता हिंदी भाषेचे अध्यापन करणे पसंत कराल का ? (होय/नाही)

३९) असे अभ्यास करण्यास कोणत्या अडचणी येतील असे वाटते ?

१)

२)

३)

४)

४०) हिंदी विषय अध्यापनात आपणांस कोणकोणत्या अडचणी येतात ?

१)

२)

३)

४)

५)

४१) रोजच्या अध्यापनात आपण कोणत्या पध्दतीचा वापर करता ?

पध्दतीचे नांव | पाठ क्रमांक

१) व्याकरण अनुवाद प्रणाली

२) स्वाभाविक प्रणाली

३) पाठ्य पुस्तक प्रणाली

४) वेस्ट प्रणाली

५) नाट्यीकरण

६) व्याख्यान प्रणाली

७) चर्चा

८) स्वाध्याय.

४२) विद्यार्थ्यांचे विषयज्ञान वाढावे म्हणून आपण खालील पैकी कोणते उपक्रम आयोजित करता ?

१) पूरक वाचन

२) पाठांतर

३) स्पर्धा - लेखी - तोंडी

४) विविध दिन -

५) परिसंवाद -

६) रेडिओ व्याख्यान

७) भाषिक खेळ

८) हस्तलिखिते

९) इतर

४३) आपल्या शाळेत हिंदीचे स्वतंत्र हस्तलिखित निघते काय ? (होय/नाही)

४४) इयत्ता ८ वी विद्यार्थ्यांना हस्तलिखित संधी दिली जाती काय ? (होय/नाही)

४५) आपण क्रमिक पुस्तकातील पाठांसाठी कोणता उपक्रम आयोजित करता ?

| पाठाचे नांव | पाठाचा प्रकार | उपक्रमाचे नांव | इतर |
|---|---|---|---|
| | १) निबंध | | |
| | २) कहानी | | |
| | ३) नाटयछटा | | |
| | ४) जीवनी | | |
| | ५) कविता | | |
| | ६) प्रकृती वर्णन | | |

४६) असे एकूण किती उपक्रम एका वर्षात करता ?

४७) घटकानुसार योग्य अध्यापन पध्दती माहित असूनही तिचा वापर न करता याच्यामागील अडचणी कोणत्या ?

१) आर्थिक बोजा पडतो.

२) वेळ वाया जातो.

३) श्रम अधिक करावे लागतात.

४) अभ्यासक्रम पूर्ण होत नाही.

५) मुलांचे सहकार्य मिळत नाही.

६) परीक्षा निकालावर परिणाम होतो.

७) इतर -

४८) आपले विद्यार्थी एस.एस.सी.परीक्षेत हिंदी विषयात सन्मानासह उत्तीर्ण झाले आहेत काय ? (होय/नाही)

४९) गेल्या पाच वर्षात असा बहुमान किती विद्यार्थ्यांना मिळाला.

५०) एका घटकाच्या अध्यापनासाठी (३५ ते ४०) तयारी करण्यास आपणांस किती वेळ लागतो ?

| घटक | तयारी करण्यास लागणारा वेळ (तासात व मिनिटात लिहा) |
|---|---|

१) गद्य

२) पद्य

३) निबंध

४) व्याकरण

५) कहानी

६) नाटयीकरण

७) इतर

५१) हिंदी अध्यापनात सुधारणा व्हावी म्हणून कोणत्या प्रकारची मदत व्हावी असे आपणांस वाटते ?

१) दिग्दर्शित पाठ व्हावेत.

२) महाविद्यालयाशी संपर्क साधावा.

३) वैयक्तिक मार्गदर्शन मिळावे.

४) सेवांतर्गत सोयी मिळाव्यात.

५) विस्तार सेवाकेंद्राची मदत मिळावी.

६) तज्ञाच्या भेटी व व्याख्याने ऐकावी.

७) संशोधन साहित्य, संशोधन साहित्याची उपलब्धता असावी.

८) इतर -

५२) आपल्या अध्यापन पध्दती सुधारण्यास खालील पैकी कोणाची मदत होते ?

१) सहकारी

२) मुख्याध्यापक

३) विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

४) पालकांचा प्रतिसाद

५) सेवांतर्गत संधी

६) इतर

५३) इयत्ता ८ वीच्या पाठ्य पुस्तकातील कोणते पाठ अवघड वाटतात ?

| पा.क्र. | पाठाचे नांव | अवघड विषय | योग्य अध्यापन पध्दतीचा वापर न करता येणे. | संदर्भ कठीण | साहित्य मिळत नाही |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

५४) सूक्ष्म अध्यापन तंत्र आपणांस अवगत आहे काय ? (होय/नाही)

५५) असल्यास या तंत्राचा उपयोग आपले अध्यापन सुधारण्यासाठी झाला आहे काय ? (होय/नाही)

५६) या तंत्रामुळे आपली अध्यापन पध्दती सुधारण्यासाठी कोणकोणते फायदे झाले आहेत ?

५७) आपण मूल्यमापन तंत्राचा अवलंब करता काय ? (होय/नाही)

५८) त्याचप्रमाणे घटक चाचणी तयार करता काय ? (होय/नाही)

५९) या खेरीज इतर कोणत्या अध्यापन तंत्राचा वापर करता. कृपया नोंद करा.

६०) हिंदी अध्यापनाच्या संदर्भात आपल्या दृष्टीने उपयुक्त वाटणारी आणखी कांही माहिती द्यावयाची असल्यास ती कृपया येथे द्यावी.

## परिशिष्ट क्र. २

### मुलाखत प्रश्नावली - मुख्याध्यापकांसाठी

१) नांव -

२) शाळा -

३) शैक्षणिक पात्रता - अ) पदवीचे विषय -

४) अनुभव - ब) अध्यापन विषय -

अ) सहशिक्षक म्हणून -

ब) मुख्याध्यापक म्हणून -

५) हिंदी भाषेला केंद्र शासनाने संरक्षण दिले आहे पण या भाषेला जनतेने स्विकारले नाही. याविषयी आपले मत काय ?

६) मुलांना हिंदी भाषेची गोडी लावण्यामध्ये इतर भाषांचा अडसर आहे. हे विधान किती प्रमाणात सत्य आहे.

७) हिंदी भाषा अध्यापन पध्दती आणि इतर भाषा अध्यापन पध्दती यामध्ये काही बाबतीत साम्य असले तरी, बरी बाबतीत फरक आढळून येतो यामुळे हिंदी अध्यापनावर कोणता परिणाम होतो.

८) व्याकरण शिकले म्हणजे भाषा येईल असा समज आहे. हा समज कितपत बरोबर आहे.

९) असे असेल तर हिंदी भाषा बोलता व लिहता येण्यासाठी कोणत्या तंत्राचा वापर करावा लागेल.

१०) सामान्यपणे अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांवर भाषिक ताण अधिक पडतो असे मानतात. हिंदी भाषा आत्मसात न होण्याचे हे कारण असू शकेल काय ? यासाठी आपण काय उपाय सुचवाल ?

११) हिंदी अध्यापनात सुधारणा होण्यासाठी शिक्षण महाविद्यालयानी कोणते प्रयत्न करावे, असे आपणास वाटते.

१२) आपण हिंदी शिक्षकांच्या अध्यापनाचे वर्षातून किती वेळा पाठनिरीक्षण करता ?

१३) शिक्षकांच्या हिंदी अध्यापनात कोणत्या उणीवा आढळतात.

१४) हिंदी भाषेच्या अध्ययन अध्यापनाबाबत सांप्रत व्यवस्थेबद्दल आपले मत काय ?

## परिशिष्ट क्र. ३

### बार्शी तालुक्यातील माध्यमिक शाळा

| अनु.क्र. | शाळेचे नांव |
|---|---|
| १) | सुलाखे हायस्कूल, बार्शी |
| २) | सिल्व्हर ज्युबिली हायस्कूल, बार्शी |
| ३) | एस.डी.यु. मॉडेल हायस्कूल, बार्शी |
| ४) | महाराष्ट्र विद्यालय, बार्शी |
| ५) | शेठ अगरचंद कुंकूलोळ प्रशाला, बार्शी |
| ६) | बार्शी टेक्निकल हायस्कूल, बार्शी |
| ७) | एस.एच.एन.एन.शाहा कन्या प्रशाला, बार्शी |
| ८) | जनसेवा हायस्कूल, बार्शी |
| ९) | अँग्लो उर्दू हायस्कूल, बार्शी |
| १०) | विद्यामंदीर कन्या प्रशाला, बार्शी |
| ११) | तुळशीदास जाधव प्रशाला, वैराग |
| १२) | मित्र विद्यालय, मळेगांव |
| १३) | श्री यमाईदेवी विद्यामंदीर, कोरफळे |
| १४) | विद्यामंदीर हायस्कूल, वैराग |
| १५) | आदर्श न्यू इंग्लीश स्कूल, गौडगांव |
| १६) | लोकसेवा विद्यालय, आगळगांव |
| १७) | किसान कामगार विद्यालय, उपळाई ठोंगे |
| १८) | सर्वोदय विद्यामंदीर, पांगरी |
| १९) | संत ज्ञानेश्वर विद्यालय, भातांबरे |
| २०) | संत तुकाराम विद्यालय, पानगांव |

| अनु. क्र. | शाळेचे नांव |
|---|---|
| २१) | एम.जी. विद्यालय, काटेगांव |
| २२) | के.बी.पाटील विद्यालय, चिखर्डे |
| २३) | वडारिया विद्यालय, उपळे दुमाला |
| २४) | कर्मवीर विद्यालय, चारे |
| २५) | रामगिरी विद्यालय, जवळगांव |
| २६) | लोकसेवा विद्यालय, श्रीपत पिंपरी |
| २७) | साकत हायस्कूल, साकत |
| २८) | श्री शिवाजी हायस्कूल, बामगांव |
| २९) | नागनाथ हायस्कूल, घारी |
| ३०) | सरस्वती विद्यालय, नारी. |

## परिशिष्ट क्र. ४

### मुलाखतीसाठी निवडलेले मुख्याध्यापक व तज्ञ.

| अनु.क्र. | नांव | शाळेचे नांव |
|---|---|---|
| १) | श्री. कार्यकर्ते द. ना. | सुलाखे हायस्कूल, बार्शी |
| २) | श्री. मदने डी. एल. | सिल्व्हर ज्युबिली हायस्कूल, बार्शी |
| ३) | " गाढवे एस. एच. | महाराष्ट्र विद्यालय, बार्शी |
| ४) | " पाटील आर. सी. | शेठ आगरचंद कुंकूलोळ हायस्कूल, बार्शी |
| ५) | सौ. आठल्ये एस. पी. | |
| ६) | | श्री यमाईदेवी प्रशाला, कोरफळे |
| ७) | श्री. कुलकर्णी पं. ना. | विद्यामंदीर कन्या प्रशाला, वैराग |
| ८) | " कदम बी. सी. | लोकसेवा विद्यालय, आगळगांव |
| ९) | " पाटील एस. के. | आदर्श न्यु इंग्लीश स्कूल, गौडगांव. |
| १०) | " दास ऐ. के. | सरस्वती विद्यालय, नारी |
| ११) | डॉ. तिवारी बी. डी. | वालचंद कॉलेज, सोलापूर |
| १२) | डॉ. पाठक पी. पी. | डी. बी. एफ. दयानंद कॉलेज, सोलापूर |
| १३) | डॉ. पटेकरी एम. यू. | श्री शिवाजी कॉलेज, बार्शी |
| १४) | प्रा. सुगांवकर एस. आय. | संगमेश्वर कॉलेज, सोलापूर. |
| १५) | प्रा. ठकार एम. एस. | वालचंद कॉलेज, सोलापूर. |

## परिशिष्ट - क्र. ५

### मुलाखतीसाठी घेतलेल्या पालकांची यादी.

| अनु.क्र. | नांव | गांव |
|---|---|---|
| १) | शिवाजी गणपत पाटील | बार्शी |
| २) | शंकर रामू गव्हाणे | " |
| ३) | अंबऋषी बाबू पवार | " |
| ४) | नागनाथ शंकर अणाबुले | " |
| ५) | रामभाऊ दाजीबा मंडलिक | " |
| ६) | सिद्रामप्पा शिवप्पा कोरे | " |
| ७) | एकनाथ जनार्दन ननवरे | " |
| ८) | नरेंद्र काशीनाथ गानबोटे | " |
| ९) | सुधीर वामन निनावे | " |
| १०) | गोविंदराव विनायक कुलकर्णी | " |
| ११) | बाबामिया चाँदसो मुलाणी | " |
| १२) | अहमद इसाकभाई तांबोळी | " |
| १३) | जीवलाल प्रेमचंद माढेकर | " |
| १४) | प्रतापदास केसवदास धोका | " |
| १५) | झुंबरलाल बालकिसनलाल तोसावाड | " |
| १६) | शिवलींग अप्पा नागप्पा उबळे | " |
| १७) | भैरु तुकाराम माळी | " |
| १८) | मलका एकनाथ गवळी | " |
| १९) | भालचंद्र नारायणराव देशपांडे | " |
| २०) | गोविंद हरि पत्की | " |

## परिशिष्ट - क्र. ५

### मुलाखतीसाठी घेतलेल्या पालकांची यादी

| अ.क्र. | नांव | गांव |
| --- | --- | --- |
| २१) | संभाजी शामराव शिंदे | पानगांव |
| २२) | नजरूद्दीन सैफुद्दीन शेख | पानगांव |
| २३) | नानासाहेब अंबादास काळे | पानगांव |
| २४) | ज्ञानेश्वर पांडुरंग रणशूर | वैराग |
| २५) | भगवान बळी क्षीरसागर | वैराग |
| २६) | देवीदास शंकर पवार | वैराग |
| २७) | निसार अहमद बागवान | चिखर्डे |
| २८) | रामचंद्र कृष्णा डुंगळे | चिखर्डे |
| २९) | गिरीश बळवंत झरेगांवकर | उपळाई |
| ३०) | भगवान विठ्ठल कुलकर्णी | उपळाई |
| ३१) | नहीमुद्दीन नजरूद्दीन नाईकवाडी | काटेगांव |
| ३२) | दत्तात्रय विश्वनाथ पालकर | आगळगांव |
| ३३) | धनंजय शिवाजी माने | आगळगांव |
| ३४) | पंडीत नारायण काळे | मळेगांव |
| ३५) | नारायण रामचंद्र देशपांडे | मळेगांव |
| ३६) | सुधाकर शंकर पिसवे | उपळाई(ठोंगे) |
| ३७) | काशीनाथ प्रतापराव ठोंगे | उपळाई(ठोंगे) |
| ३८) | पंडित वामन जोशी | कोरफळे |
| ३९) | गंगाबाई विश्वंभर पाठक | कोरफळे |
| ४०) | शामराव वामन कोरफळकर | कोरफळे |

## परिशिष्ट क्र. ६

## पालकांच्याकरिता तयार केलेली प्रश्नावली

प्र. १ आपण आपल्या पाल्यांच्या स्वाध्यायाकडे लक्ष देता का ?

प्र. २ देत असल्यास कोणत्या पध्दतीने ?

प्र. ३ आपण आपल्या पाल्याच्या शाळेत वर्षातून किती वेळा भेट देता ?

प्र. ४ भेट देत असल्यास कोणकोणत्या कारणास्तव ?

प्र. ५ आपण आपल्या पाल्यांच्या संदर्भात शिक्षकाकडून कोणत्या अपेक्षा करता ?

प्र. ६ माध्यमिक शिक्षणानंतर आपल्या पाल्यास कोणत्या ज्ञानशाखेकडे पाठविण्याचे योजिले आहे ?

प्र. ७ पाल्याने शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कोणता व्यवसाय करावा असे आपणास वाटते ?

परिशिष्ट क्र. ७

प्रतिसाद शिक्षकांची यादी.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| १) | श्री. पुरवंत सुधिर रत्नाकर |
| २) | " कुलकर्णी जयंत वासुदेव |
| ३) | " कुटे लक्ष्मण रामचंद्र |
| ४) | " कुलकर्णी जगन्नाथ गणेश |
| ५) | " अंधारे श्रीधर शुंबर |
| ६) | " जाधव आदिनाथ भगवान |
| ७) | " स्वामी रमेश शिवलिंग |
| ८) | सौ. महाजन विजया प्रभाकर |
| ९) | श्रीमती टाकळीकर शान्ता भानुदास |
| १०) | श्री. सालटे तुळशीदास दगडू |
| ११) | श्री. देशमुख जनार्दन नारायण |
| १२) | श्री. पाटील श्यामराव दादासाहेब |
| १३) | " गाढवे रमेश भिमराव |
| १४) | " कोरे रामलिंग शिवाप्पा |
| १५) | " डिंगरे सुरेश दत्तात्रय |
| १६) | कु. दिक्षीत सुनिता मुरलीधर |
| १७) | श्री. पाठक शंकर अच्युत |
| १८) | " कोळी शिवाजी भानुदास |
| १९) | " शिम्दे तुकाराम शंकर |
| २०) | " माने बाबासाहेब नारायण |

| अ.नं. | नांव |
|---|---|
| २१) | श्री. क्षीरसागर विजय प्रतापराव |
| २२) | " आगलावे गोविंद विठ्ठल |
| २३) | " डिसले नागनाथ श्रीपत |
| २४) | " लांडगे नारायण शिवाजी |
| २५) | " शेख इस्माइल बाबामीयां |
| २६) | " गोसावी पंढरीनाथ वासुदेव |
| २७) | " साठे अंबक्रम भगवान |
| २८) | " कुलकर्णी सुधाकर केशव |
| २९) | सौ. पाटील प्रभा प्रकाश |
| ३०) | श्री. कांबळे बाबासाहेब गौतम |

# संदर्भ ग्रंथांची यादी

## मराठी


१) कुंडले म.बा. - मराठीचे अध्यापन,
विद्या प्रकाशन, शनिवार पेठ,
पुणे, १९७४.

२) डॉ.पारसनिस न.रा. - शिक्षणाची तात्विक आणि समाजशास्त्रीय भुमिका,
नूतन प्रकाशन, पुणे, १९८७.

३) बापट भालचंद्र गोपाळ - शैक्षणिक संशोधन,
नूतन प्रकाशन, पुणे,

४) प्रा.मुळे रा.शं.
प्रा.उमाठे वि.तु. - शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे,
महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,
नागपूर, १९७०.

५) दांडेकर वा.ना. - शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र,
श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८५.

६) डॉ.सोनार म.शि. - दृकश्राव्य शिक्षण साहित्य तंत्र व पध्दती,
गो.म.राणे प्रकाशन, पुणे, १९७०.

मासिके.

७) डॉ.कुंडले म.बा. - प्रधान संपादक, शिक्षण समिक्षा,
नामजीभाई टाउन,सीताबर्डी,
नागपूर, अंक ५,६

८) डाहुले का.के. - संपादक, जीवन शिक्षण, म.रा.शै.संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३०.

९) कुवळेकर वि.वि. - संपादक, दैनिक सकाळ, पुणे, दि. १२-११-८७

## हिन्दी

१०) डॉ.जोगळेकर न.चि., डॉ. तिवारी भगवानदास - राष्ट्रभाषा विचार संग्रह, अनाथ विद्यार्थी गृह, सदाशिव पेठ, पुणे, १९६५.

११) केणी सज्जनराम, कुलकर्णी हरीकृष्ण - हिन्दी की अध्यापन पध्दती, व्हिनस प्रकाशन, पूना, १९७३.

१२) डॉ.चोबे शरयुप्रसाद - स्वदेश विदेश में शिक्षा, विनोद पुस्तक मन्दिर, आगरा, १९८४.

१३) सुखीया एस.पी., मेहरोत्रा आर.एन., मेहरोत्रा पी.वी. - शैक्षिक अनुसंधान के मूलतत्व, विनोद पुस्तक मन्दिर, आग्रा, १९८४.

१४) डॉ. खण्डेलवाल रामेश्वरलाल. - समिक्षा के वातायन, सूर्य प्रकाशन, दिल्ली, १९७४.

१५) डॉ. गंगावणे क.ह., सौ. लटके नलिनी, ठाकुरदेसाई र.वि. - संपादक, लोकभारती, आठवी कक्षा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, १९८२.

१६) तनसुखराम - प्रबन्ध पराग,
सूर्य प्रकाशन, दिल्ली, १९८५.

मासिके

१७) शर्मा एम.डी. - संपादक, राष्ट्रवाणी,
महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा
पूना, १९७०.

१८) वर्मा आर.के. - संपादक, राष्ट्रभाषा पत्र
उत्कल प्रांतिय राष्ट्रभाषा प्रचार सभा,
राष्ट्रभाषा रोड, कटक – ८
(उडीसा), १९६०.

१९) गोयल शिवकुमार - संपादक, हिन्दुस्थान समाचार,
वार्षिकी, १९६४.

इंग्रजी

20) Buch M.B. - (Edi) A Survey of Research in Education,
Baroda M.S. University Centre of Advanced Study in Education faculty of Education and Psychology, Baroda, 1974.

21) Buch M.B. - (Edi) A Second Survey of Research in Education, 1972-1978.
Baroda, Society for Educational Research and Development, Baroda, 1979.

22) Best John W. - Research in Education,
Prentic - Hall of India Pvt.Ltd.
New Delhi, 1983.

23) Dr.Upasani N.K. - Conducting Educational Research
S.N.D.T.Women's University,
Bombay, 1987.

REPORTS

24) Report of the Hindi Teaching Committee, Bombay State,
Bombay, 1950.

25) Report of the Secondary Education Commission,
Oct.-1952, June - 1953,
Ministry of Education, New Delhi.

26) Report of the Educational Commission, 1964- 66,
Education and National Development,
Ministry of Education,
Government of India,
New Delhi, 1966.

27) Syllabus -
Maharashtra State Board of Secondary and
Higher Secondary Education,
Syllabus for Standard VIII to X, - Pune, 1981.